# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
(सचिवालय)

## नोटीस

महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम कलम 19(5) अन्वये नागपूर महानगरपालिका महापौर (खुला) प्रवर्ग व उपमहापौर (अनारक्षित) यांचे पदाच्या उर्वरीत कालावधीकरीता निवडणूक विशेष सभा मंगळवार दिनांक 05/01/2021 रोजी सकाळी 11–00 वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशिमबाग, नागपूर येथे खालील विषयावर आयोजित करण्यांत येत आहे.

या सभेस विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांचे आदेश क्र. एमयुएन–19(2)/कावि–195/2020 दिनांक 23 डिसेंबर, 2020 अन्वये मा. जिल्हाधिकारी, हे पिठासीन अधिकारी म्हणून उपस्थित राहणार आहे तसेच

पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र. सचिवालय/1468 दिनांक 28 डिसेंबर, 2020 अन्वये हि निवडणूक सभा असल्याने ऑनलाईन घेतेवेळी अनेक तांत्रिक बाबींचा खंड होवू शकतो जसे इंटरनेट सेवा, मा. सदस्यांची नेट कनेक्टीव्हीटी या दृष्टीने हि सभा ऑफलाईन घेण्यास परवानगी प्राप्त असून सध्या कोविड–19 या रोगाचा प्रादुर्भाव असल्यामुळे तसेच संसर्गाचा धोका टाळण्याकरीता उपरोक्त बैठकी प्रसंगी मा. पदाधिकारी व अधिकारी वर्गानी सोशल डिस्टंन्स/फिजीकल डिस्टंन्स, मास्क, सॅनिटायजरचा वापर करावा.

सर्व सन्मानिय सदस्य/सदस्या यांनी महानगरपालिकेचे दिलेले ओळखपत्र स्वतः जवळ ठेवावे हि विनंती.

आदेशान्वये,

नागपूर
दिनांक :– 28–12–2020

(डॉ. रंजना लाडे)
निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

विषय क्रमांक 1 :– श्री. संदीप जोशी, मा. महापौर यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 19(4) अन्वये लेखी सुचना देवून महापौर पदाचा दि. 21.12.2020 रोजी राजीनामा दिलेला असल्यामुळे सदरचा राजीनामा मा. आयुक्त यांचे पत्र क्र. 336 दि. 21.12.2020 अन्वये पुढील योग्य त्या कार्यवाही करीता सचिवालय विभागाकडे पाठविलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 19(5) अन्वये महापौर (खुला) प्रवर्ग पुढील उर्वरीत पदावधी करीता निवड करणे.

विषय क्रमांक 2 :– श्रीमती मनिषा कोठे, मा. उपमहापौर यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 19(4) अन्वये लेखी सुचना देवून उपमहापौर पदाचा दि. 21.12.2020 रोजी राजीनामा दिलेला असल्यामुळे सदरचा राजीनामा मा. आयुक्त यांचे पत्र क्र. 337 दि. 21.12.2020 अन्वये पुढील योग्य त्या कार्यवाही करीता सचिवालय विभागाकडे पाठविलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 19(5) अन्वये उपमहापौर (अनारक्षित) पुढील उर्वरीत पदावधी करीता निवड करणे.

सहपत्र :– 1) निवडणूक कार्यक्रमाचे वेळापत्रक
2) नामनिर्देशन पत्र/फॉर्म

मागे पहा......./–

REDMI NOTE 9 PRO
PHOTO BY VILAS

महापौर (खुला) प्रवर्ग व उपमहापौर (अनारक्षीत) कार्यक्रम खालील प्रमाणे राहिल.

१) <u>महापौर (खुला) पदाचे निवडणूक कार्यक्रम</u> :— <u>पिठासीन अधिकारी मा. विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी राहतील</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र स्वीकारणे | बुधवार दि. ३०/१२/२०२० रोजी<br>(सभेच्या किमान ३ दिवसा आधी) | सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत निगम सचिव द्वारे<br>स्थळ :— डॉ. पंजाबराव देशमुख, स्थायी समिती सभागृह, नागपूर महानगरपालिका |
| २ | विशेष सभा | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सकाळी ११.०० वाजता<br>कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशिमबाग, नागपूर |
| ३ | नामनिर्देशन पत्राची छाननी | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सभेच्या दिवशी (सभा सुरु झाल्यानंतर)<br>सभा स्थळी पिठासीन अधिकाऱ्याद्वारे |
| ४ | नामनिर्देशन पत्र मागे घेणे | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सभेच्या दिवशी नामनिर्देशन पत्राची छाननी केल्यानंतर पिठासीन अधिकाऱ्याद्वारे वैध उमेदवारांची नावे वाचून दाखविल्यानंतर पिठासीन अधिकाऱ्याद्वारे उमेदवारी मागे घेण्याच्या प्रक्रियेची घोषणा केल्यानंतर १५ मिनिटाच्या आंत स्वत: उमेदवाराने लेखी नोटिस द्वारे पिठासीन अधिकाऱ्याकडे सादर करणे. |
| ५ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे घोषित करणे | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सभेच्या दिवशी (उक्त प्रक्रियेनंतर)<br>पिठासीन अधिकाऱ्याद्वारे |
| ६ | मतदान (आवश्यक असल्यास) | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सभेच्या दिवशी (उक्त प्रक्रियेनंतर)<br>पिठासीन अधिकाऱ्याद्वारे घेणे. |
| ७ | निवडणूक निर्णयाची घोषणा | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सभेच्या दिवशी (उक्त प्रक्रियेनंतर)<br>पिठासीन अधिकाऱ्याद्वारे |

२) <u>उपमहापौर (अनारक्षित) पदाचे निवडणूक कार्यक्रम</u> :— <u>पिठासीन अधिकारी मा. विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी राहतील</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र स्वीकारणे | बुधवार दि. ३०/१२/२०२० रोजी<br>(सभेच्या किमान ३ दिवसा आधी) | सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत निगम सचिव द्वारे<br>स्थळ :— डॉ. पंजाबराव देशमुख, स्थायी समिती सभागृह, नागपूर महानगरपालिका |
| २ | विशेष सभा | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सकाळी ११.०० वाजता (महापौर पदाची निवडणूक संपन्न झाल्यानंतर)<br>कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशिमबाग, नागपूर. |
| ३ | नामनिर्देशन पत्राची छाननी | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सभेच्या दिवशी महापौर निवडणूक संपन्न झेल्यान (सभा सुरु झाल्यानंतर)<br>सभा स्थळी पिठासीन अधिकाऱ्याद्वारे |
| ४ | नामनिर्देशन पत्र मागे घेणे | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सभेच्या दिवशी नामनिर्देशन पत्राची छाननी केल्यानंतर पिठासीन अधिकाऱ्याद्वारे वैध उमेदवारांची नावे वाचून दाखविल्यानंतर पिठासीन अधिकाऱ्याद्वारे उमेदवारी मागे घेण्याच्या प्रक्रियेची घोषणा केल्यानंतर १५ मिनिटाच्या आत स्वत: उमेदवाराने लेखी नोटिस द्वारे पिठासीन अधिकाऱ्याकडे सादर करणे. |
| ५ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे घोषित करणे | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सभेच्या दिवशी (उक्त प्रक्रियेनंतर)<br>पिठासीन अधिकाऱ्याद्वारे |
| ६ | मतदान (आवश्यक असल्यास) | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सभेच्या दिवशी (उक्त प्रक्रियेनंतर)<br>पिठासीन अधिकाऱ्याद्वारे घेणे. |
| ७ | निवडणूक निर्णयाची घोषणा | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ रोजी | सभेच्या दिवशी (उक्त प्रक्रियेनंतर)<br>पिठासीन अधिकाऱ्याद्वारे |

आदेशान्वये

(डॉ. रंजना लाडे)
निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर.

REDMI NOTE 9 PRO
PHOTO BY VILAS